पनवेल (प्रतिनिधी) रामशेठ ठाकूर यांचा समजासेवेचा वारसा घेवून आमदार प्रशांत ठाकूर यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी झटलेल्या क्रांतिवीरांचे आणि देशाचे रक्षण करणाऱ्या वीरांचे स्मरण ठेवून त्यांचा यथोचित सन्मान केला आणि इतिहास माहित असेल तरच पुढच्या पिढीचा व पर्यायाने देशाचा उत्कर्ष होईल, याची जाणिव ठेवून खऱ्या अर्थाने सामाजिक जबावदारी पार पाडली, असे प्रतिपादन राज्याच्या विधानपरिषदेचे सभापती शिवाजीराव देशमुख यांनी येथे केले.

ऑगस्ट क्रांतीदिनाचे औचित्य साधून पनवेल तालुका व शहर कॉंग्रेस कमिटीच्या वतीने शहरातील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पनवेल तालुक्यातील स्वातंत्र्यसैनिक, त्यांचे उत्तराधिकारी आणि माजी सैनिकांचा हृद्य सत्कार विधानपरिषदेचे सभापती शिवाजीराव देशमुख यांच्या हस्ते शनिवारी (दि.०९) करण्यात आला. या भव्य सन्मान सोहोळयात आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल विधानसभा मतदार संघात केलेल्या विकासकामांच्या पाऊलखुणांची माहिती देणाऱ्या 'प्रशांतपर्व' या कार्यअहवाल पुस्तिकेचे प्रकाशन शिवाजीराव देशमुख यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

शिवाजीराव देशमुख पुढे म्हणाले की, क्रांतिकारकांचा इतिहास आणि सीमेवर अहोरात्र झटणाऱ्या शूरविरांच्या वीरकथा आपण नव्या पिढीला सांगितल्या पाहिजेत. देश घडविण्यासाठी त्यांनी केलेली चळवळ, देशासाठी दिलेले योगदान, अनेकांनी राष्ट्र संरक्षणासाठी दिलेली प्राणाची आहुती ही सदैव भारतीय जनतेला स्फुर्ती दायक ठरेल, अशा शब्दात देशमुख यांनी स्वातंत्र्यसैनिक आणि माजी सैनिकांचा गौरव केला. ते पुढे म्हणाले की, प्रशांतसारखे तरूण, कर्तबगार नेतृत्व या परिसराला लाभले आहे, अशा धेय्यवादी आणि कतृत्ववान लोकप्रतिनिधीच्या पाठिशी येथील जनता नेहमीच उभी राहिल, असेही शिवाजीराव देशमुख म्हणाले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, इंग्रजांच्या जोखडातून आपल्या मायभुमीला मुक्त करण्यासाठी 'चलेजाव' चा नारा देवून देशात स्वातंत्र्यसैनिकांनी क्रांती घडवली. या क्रांतीमुळेच आज आपण स्वातंत्र्य अनुभवत आहोत. आजही आपल्याला अनिष्ठ प्रथेच्या बंधनातून समाजाला मुक्त करण्यासाठी अंधश्रध्देविरूध्द क्रांती, महिलांच्या आत्मसन्मानाची क्रांती, स्त्रीभुण हत्येविरोधी क्रांती, एडसविरोधी क्रांती, भ्रष्टाचाराविरोधी क्रांती घडवायची आहे, असा दृढ निश्चय लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केला.

बलशाली भारत चिरंतन रहावा, यासाठी ०९ ऑगस्ट रोजी क्रांती घडली. याच दिवशी देशासाठी जगण्यासाठी आणि देशासाठीच मरण्याची शपथ क्रांतिकारांनी घेतली आणि येथूनच क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली गेली म्हणून या दिवसाचे स्मरण रहावे, तसेच स्वातंत्र्यसैनिक आणि माजी सैनिक यांचे जीवन आदर्शवत व प्रेरणादायी ठरावे या हेतूने आज या सन्मान सोहोळयाचे आयोजन केले असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणातून बोलताना स्पष्ट केले. रायगड जिल्हयाला आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचा वारसा लाभला असून त्यांचे कार्य आम्हाला सदोदीत प्रेरणा देत राहिल असे सांगून ते पुढे म्हणाले की, स्वातंत्र्यसैनिकांच्या उत्तराधिकाऱ्यांचे तसेच माजी सैनिकांचे प्रश्न, अडचणी आणि विविध समस्या सोडवून त्यांना सन्मान मिळवून देण्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत.

ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी आपले मत व्यक्त करताना म्हंटले की, देशभक्ती, क्रांती आणि चळवळींच्या वातारवरणातच आमच्या पिढीचे वैचारिक पोषण झाले. देश एकसंघ ठेवण्यासाठी अनेक शूरवीरांनी प्राणांची आहुती दिली आहे. अशा देशप्रेमींनी राष्ट्रसाठी दिलेल्या योगदानामुळेच देश घडला, मोठा झाला याची जाणिव आजच्या पिढीला करून देण्यासाठी देशाचा हा क्रांतीकारी इतिहास आपण सर्वांनी सांगितला पाहिजे.

या सोहोळयास प्रदेश कॉंग्रेसचे सरचिटणीस संजय चौपाने, रायगड जिल्हा अध्यक्ष आर.सी.घरत, ज्येष्ठ नेते डॉ.भक्तीकुमार दवे, उपाध्यक्ष सुदाम पाटील, इंटकचे प्रदेश कार्याध्यक्ष महेंद्र घरत, नगराध्यक्षा चारूशिला घरत, उपनगराध्यक्ष मदन कोळी, माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला, माजी उपनगराध्यक्ष आबा खेर, ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, के.एस.पाटील, शशिकांत बांदोडकर, पनप गटनेते अनिल भगत, बांधकाम सभापती राजू सोनी, पनवेल शहर कॉंग्रेसचे अध्यक्ष जयंत पगडे, कार्याध्यक्ष अरविंद सावळेकर, नगरसेवक संतोष शेट्टी, प्रकाश विनेदार, गणेश पाटील, गणपत म्हात्रे, लतीफ शेख, नगरसेविका अलका भगत, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी.गडदे, मावळ लोकसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष किशोर चौतमोल, पनवेल विधानसभा अध्यक्ष दशरथ म्हात्रे, तालुका कॉंग्रेसचे उपाध्यक्ष के.ए.म्हात्रे, महिला शहर अध्यक्षा वर्षा नाईक, तालुका कार्याध्यक्षा रत्नप्रभा घरत, विधानसभा महिला प्रभारी दर्शना भोईर, सांस्कृतिक विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर आघारकर, जिल्हा स्वातंत्र्यसैनिक उत्तराधिकारी संघटनेचे सरचिटणीस बबन जगनाडे, माजी नगरसेवक सिराज सय्यद, एनएसयुआयचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, मानव संसाधन विभागाचे जिल्हाध्यक्ष अभिजीत पाटील, उत्तर भारतीय सेलचे जिल्हाध्यक्ष सुनिल विश्वकर्मा, आदी मान्यवर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. या समारंभास सत्कारमुर्तीसह त्यांचे कुटुंबीय मोठया संख्येने उपस्थित होते.